# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे


| | | |
|---|---|---|
| **अतिरिक्त संचालक**<br>दुरध्वनी क्रमांक (वैयक्तिक)<br>०२०-२६०५८९९६ | | **अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,**<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे - ४११००१, दुरध्वनी- ०२० - २६०५८७३९, २६०५८१३९, २६०५८४७६<br>**Email – spm.pune1@gmail.com** 51457-51563 |
| **आरोग्य सेवा** | | **जा.क्र राकुकका/ बाल आरोग्य कक्ष १५-क** / MPCDSR Guideline / /**२०२२**<br>**दि** 20 / 7 /२०२२ |


**प्रति,**

1) उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय परिमंडळ, (सर्व)
2) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ( सर्व)
3) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जिल्हा (सर्व)
4) वैदयकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
5) कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई, महानगरपालिका

**विषय - MPCDSR Software (बालमृत्यू अन्वेषण Software) बाबत मार्गदर्शक सुचना ......**

उपरोक्त विषयान्वये, केंद्रशासनाने ऑनलाईन पध्दतीने बालमृत्यू अन्वेषणाची माहिती भरण्याकरीता MPCDSR Software विकसीत केले आहे. याबाबत दिनांक १४/६/२०२२ रोजी व्हिसीव्दारे सदर **MPCDSR Software** चे प्रशिक्षण वेबिनारव्दारे आयोजन करण्यात आले होते. **MPCDSR Software** चे लॉग इन आयडी व पासवर्ड जिल्हयांना यापूर्वी पाठविण्यात आलेले आहेत.

**MPCDSR Softwareमध्ये माहिती भरण्याच्या सुचना खालील प्रमाणे आहेत.**

- एमपीसीडीएसआर (मॅटर्नल, पेरिनेटल, चाइल्ड डेथ सर्व्हिलन्स अँड रिस्पॉन्स) हे पोर्टल वापरण्यास साधे, सोपे व प्रत्यक्षदर्शी आहे.
- हे संकेतस्थळ मुख्यतः ४ स्तरावर वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. (राज्य, जिल्हा, संस्था संस्था संस्था आणि तालुका ).
- या पोर्टल मध्ये जिल्हास्तरावरुन माहिती भरु शकत नाही फक्त डेटा पाहू आणि डाउनलोड करू शकतात.
- तालुका व संस्थास्तरावरुन बालमृत्यु अन्वेषणाच्या Entry करण्यात याव्यात.

## ❖ डेटा एन्ट्रीबाबत

1. **तालुकास्तरावर -**

- डेटा एन्ट्री करीता MPCDSR Software साठी या **http://mpcdsrindia.in किवा https://mpcdsrindia.in/#/login** या URL चा वापर करावा.
- पोर्टल सुरु केल्यानंतर तालुक्यांकरिता देण्यात आलेल्या लॉग इन आयडी व पासवर्ड टाकून लॉग इन करावे.
- लॉग इन केल्यानंतर CDR वर क्लिक करुन तालुकास्तरावर घरी / रस्त्यात झालेल्या सर्व बालमृत्युंचे फॉर्म नं १ - Notification card व फॉर्म नं 2 - FBIR भरावेत.
- तसेच बालमृत्यु अन्वेषण करण्यात आलेल्या केसेसचे फॉर्म नं 3 a, b, c भरावेत.
- घरी झालेल्या सर्व बालमृत्युंच्या नोंदी सॉफ्टवेअर मध्ये होतील याची खात्री तालुका आरोग्य अधिकारी यांनी करावी. सदर बालमृत्युंच्या नोंदी सॉफ्टवेअरमध्ये तालुका आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांकडून करावी.

2. **संस्थास्तरावर -**

- डेटा एन्ट्री करीता MPCDSR Software साठी या **http://mpcdsrindia.in किंवा https://mpcdsrindia.in/#/login** या URL चा वापर करावा.
- पोर्टल सुरु केल्यानंतर संस्थाकरिता देण्यात आलेल्या लॉग इन आयडी व पासवर्ड टाकून लॉग इन करावे.
- लॉग इन केल्यानंतर CDR वर क्लिक करुन संस्थास्तरावर झालेल्या सर्व बालमृत्युंचे फॉर्म नं १ - Notification card व फॉर्म नं 4 a & b भरावेत.
- संस्थास्तरावर होणा-या सर्व बालमृत्यूंची नोंद पोर्टलमध्ये केली जाईल याची जबाबदारी निवासी वैद्यकीय अधिकारी / महानगरपालिका बालप्रजनन आरोग्य अधिकारी यांची राहील.
- SNCU मध्ये होणा-या बालमृत्युंची नोंद सॉफ्टवेअर मध्ये SNCU डेटा एंट्री ऑपरेटर करतील. तसेच SNCU व्यतिरिक्त संस्थेमध्ये इतर वॉर्डात होणा-या बालमृत्युची माहिती देखील पोर्टलमध्ये भरण्यात यावी. सदर माहिती भरण्याची जबाबदारी संस्थेतील निवासी वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय अधिक्षक यांच्या अधिनस्त कर्मचा-याची राहील.
- महानगरपालिका स्तरावर सर्व बालमृत्युंच्या नोंदी सॉफ्टवेअर मध्ये होतील याची खात्री महानगरपालिका बालप्रजनन आरोग्य अधिकारी यांनी करावी. सदर बालमृत्युंच्या नोंदी सॉफ्टवेअरमध्ये महानगरपालिका बालप्रजनन आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांकडून करावी.
- मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये / (NICU मध्ये) होणाऱ्या प्रत्येक बालमृत्यूंची नोंद पोर्टलमध्ये ठेवली जाईल याची जबाबदारी बालरोग विभागाच्या प्रमुखांची असेल. सदर बालमृत्युंच्या नोंदी ज्या NICU मध्ये NHM अंतर्गत डेटा एन्ट्री ऑपरेटर भरती करण्यात आलेले आहेत तेथे त्यांच्या मार्फत करण्यात यावेत. त्याकरीता निवासी वैद्यकीय अधिकारी / महानगरपालिका बालप्रजनन आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय महाविद्यालयाशी समन्वय साधावा.

❖ <u>रस्त्यात / संदर्भीत करताना बालमृत्यु झाल्यास -</u>

- बालमृत्यु एका आरोग्य संस्थेमधून दुस-या संस्थेमध्ये जात असताना झाल्यास (Brought Dead असल्यास) संस्थेतील ऑन डयुटी डॉक्टर फॉर्म नं 1 - Notification card पोर्टल मध्ये भरतील व त्याची माहिती रेफर करणा-या संस्थेला देतील. त्यानुसार रेफर करणा-या आरोग्य संस्थेने बालमृत्यु अन्वेषण करावे व फॉर्म नं. 4a व 4b पोर्टल मध्ये भरावे.
- तसेच बालमृत्यु घरापासुन आरोग्य संस्थेमध्ये जात असताना झाल्यास (Brought Dead असल्यास) संस्थेतील ऑन डयुटी डॉक्टर फॉर्म नं 1- Notification card पोर्टल मध्ये भरतील व त्याची माहिती तालुकास्तरावर देतील. त्यानुसार तालुकास्तरावर बालक ज्या कार्यक्षेत्रातील रहिवासी आहे त्यांनी बालमृत्यु अन्वेषण करावे व फॉर्म नं. 3a, 3b व 3c पोर्टल मध्ये भरावे.
- या MPCDSR संकेतस्थळावरून फॉर्म "**5A**", "**B**" आणि "**C**" Auto-Generate केले जातात. सदर माहिती आणि अहवाल वेगवेगळ्या-भिन्न स्तरांवर Table Format तसेच Graph Format मध्ये डाउनलोड केली जाऊ शकते. याचा वापर Child Death Analysis साठी करता येऊ शकतो.
- जिल्हास्तरावरुन बालमृत्यु अन्वेषणाची माहिती उपलब्ध करण्यासाठी जिल्हास्तरावर देण्यात आलेल्या लॉग इन आयडी व पासवर्ड चा वापर करावा.
- खाजगी हॉस्पिटल प्रा. आ. केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीमध्ये होणा-या बालकांच्या मृत्युंची माहिती ही पूर्वीच्या ५ डी (Excel) फॉरमेट मध्ये या कार्यालयास पाठविण्यात यावी.
- जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात / संस्थास्तरावर/ महानगरपालिका स्तरावर सर्व बालमृत्युंच्या नोंदी सॉफ्टवेअर मध्ये होतील याची खात्री जिल्हा बालप्रजनन आरोग्य अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी व महानगरपालिका बालप्रजनन आरोग्य अधिकारी यांनी करावी.
- तरी सर्व जिल्ह्यांनी माहे एप्रिल २०२२ पासून आपल्या जिल्ह्यात / महानगरपालिकेअंतर्गत झालेल्या बालमृत्युची माहिती सॉफ्टवेअर मध्ये भरण्यास सुरुवात करावी.
- MPCDSR Software च्या वापराबाबत काही अडचणी आल्यास राज्यस्तरावर डॉ. सारिका बोराटे - 7720088284 व श्री. प्रमोद उबाळे - 8087851073 यांच्याशी संपर्क साधावा.

19/7/22

**अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे**

**प्रत सविनय सादर,**

१) मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३) मा. संचालक, आरोग्य सेवा, पुणे